प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO WE MAKE CITIES
सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०६.०३.२०१९**

**सिडको अर्बन हाट येथे वसंत मेळयाचे आयोजन**

शिशिरातील पान गळतीनंतर वृक्ष पुन्हा एकदा कोवळ्या पालवीने, पाना-फुलांनी बहरू लागतात तेव्हा चाहूल लागते ती वसंत ऋतुची. ‘ऋतुराज’ अर्थात साऱ्या ऋतुंचा राजा असलेल्या वसंत ऋतुच्या आगमनाचे स्वागत करण्यासाठी सिडको अर्बन हाट, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई येथे **दि. ६ मार्च** ते **२५ मार्च २०१९** या कालावधीत **सकाळी ११.००** ते **रात्री ०९.००** या वेळेत वसंत मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडको अर्बन हाट हे विविध कला प्रकारांसाठी हक्काचे व्यासपीठ आहे. याबरोबरच तेथील निसर्गसंपदेमुळे निसर्ग प्रेमींना विविध प्रजातींचे वृक्ष आणि फुलपाखरे यांचे निरीक्षण करण्याची संधी मिळते. दरवर्षी ऑगस्ट महिन्यापासून अर्बन हाट येथे विविध महोत्सव व कार्यक्रमांना सुरुवात होते. ऑगस्ट २०१८ ते जून २०१९ या २७० दिवसांच्या कालावधीत अर्बन हाट येथे सुमारे २० कार्यक्रम/महोत्सव नियोजित आहेत. नुकत्याच पार पडलेल्या व नवी मुंबईकरांचा उत्तम प्रतिसाद लाभलेल्या कोकण सरस महोत्सवानंतर अर्बन हाट येथे वसंत मेळा या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

वसंत मेळ्यामध्ये महाराष्ट्र, प. बंगाल, बिहार, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, गुजराथ, राजस्थान, मध्य प्रदेश, ओदिशा, पंजाब, जम्मू आणि काश्मिर अशा विविध राज्यांतील कलाकार व कारागीर आणि स्वयं सहाय्यता गट सहभागी होणार आहेत. महोत्सवाच्या कालावधीत हातमागावर विणलेले कापड, विविध हस्तकला व कलाकुसरीच्या वस्तू आणि विविध प्रकारचे मसाले, लोणची अशी विविध उत्पादने प्रदर्शनार्थ व विक्रीसाठी मांडण्यात येतील. तसेच खवय्यांच्या रसना तृप्तीसाठी मालवणी, कोल्हापुरी, राजस्थानी असे विविध प्रांतीय खाद्यपदार्थांचे स्टॉल्सही असतील.

महोत्सवाच्या कालावधीत दर शनिवार आणि रविवार सायं. ०७.०० ते रात्री ०९.०० या वेळेत आयोजित करण्यात आलेले सांस्कृतिक कार्यक्रम महोत्सवाची रंगत वाढवणारे ठरतील. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये हिल रॉक फेस्टिव्हल, हॅपी सिंगर्स ऑर्केस्ट्रा, सरमग म्युझिकल फेस्ट, पारंपरिक बंगाली कार्यक्रम, मातृभूमी बुक फेस्टिव्हल यांचा समावेश आहे.

वसंत मेळा महोत्सवात स्टॉल उभारू इच्छिणाऱ्यांनी तसेच अधिक माहितीकरिता व्यवस्थापक, अर्बन हाट यांच्याशी **manager.urbanhaat@gmail.com** या ई-मेलवर किंवा **९५९४५२११६९** या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**